कुक्कुटपालन

# कोंबड्यांना होणाऱ्या दीर्घकालीन श्वसनरोगावर उपाय



डॉ. अभिजित बाराते
(मो.नं. ९१५६९८९८८९)
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय,
शिरवळ, जि. सातारा



कोंबड्यांना होणाऱ्या दीर्घकालीन श्वसनरोगाचे सूक्ष्मजंतू हवेतील धूळ आणि लहान थेंबांद्वारे पसरू शकतात. तसेच ते दूषित उपकरणे, दूषित पाणी, खाद्य आणि संपर्काद्वारे पसरतात. सर्वच वयोगटातील पक्ष्यांना हा रोग होण्याचा धोका असतो; परंतु लहान पक्ष्यांना याचा संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते.

कोंबड्यांना 'मायकोप्लाज्मोसिस' हा आजार मायकोप्लाइझ्मा गॅलिसेप्टिक या सूक्ष्मजीवामुळे होतो. या रोगात कोंबडीच्या श्वसन संस्थेला दीर्घ संसर्ग होत असल्यामुळे त्याला दीर्घकालीन श्वसनरोग/ Chronic Respiratory Disease (CRD) म्हणतात. या रोगाला एअरसॅक डिसिज असेही म्हणतात. या आजारात फुफ्फुसांमध्ये असलेल्या हवेच्या पिशव्या संक्रमित होतात. हा रोग प्रामुख्याने कोंबड्या आणि टर्की पक्ष्यांना होतो

**रोगाचा संसर्ग आणि प्रसार** : या रोगाचे सूक्ष्मजंतू हवेतील धूळ आणि लहान थेंबांद्वारे पसरू शकतात. तसेच ते दूषित उपकरणे, दूषित पाणी, खाद्य आणि संपर्काद्वारे पसरतात. सर्वच वयोगटातील पक्ष्यांना हा रोग होण्याचा धोका असतो; परंतु लहान पक्ष्यांना याचा संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. काही वन्य पक्ष्यांना देखील (कबुतर, कावळे, चिमण्या, बदक, जापनीज क्वेल/ बटेर आणि हंस) हा रोग होतो व तुमच्या पोल्ट्रीच्या संपर्कात असे पक्षी आल्यास कोंबड्यांना हा रोग होण्याची शक्यता असते. सर्वात महत्वाचे कोंबड्यांच्या पिलांना अंड्यातूनच या रोगाचा संसर्ग होऊ शकतो. या रोगाचा अंड्यातूनही प्रसार होत असल्यामुळे त्याला नियंत्रित करणे गुंतागुंतीचे आणि अडचणीचे होते.

म्हणून मायकोप्लाइझ्माचा प्रसार रोखण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे मायकोप्लाइझ्मा सूक्ष्मजंतूंचे प्रसारचक्र खंडित करणे. यासाठी मायकोप्लाइझ्मा संसर्गमुक्त प्राथमिक ब्रीडर पक्ष्यांचे आणि कुक्कुटांचे कळप स्थापित करावेत.

**रोगाची लक्षणे** : जर पक्ष्यांना केवळ मायकोप्लाइझ्माचा संसर्ग असेल तर त्यांच्यात श्वसनसंस्थेची सौम्य लक्षणे दिसतात आणि मृत्युदरही कमी असतो. मात्र काही वेळा मायकोप्लाइझ्माचे संक्रमण इतर जिवाणू व विषाणूंमुळे गुंतागुंतीचे होऊन खालील लक्षणे उद्‌भवतात.

१) शिंका येणे, खोकला, नाकातून स्राव येणे, घरघर होणे. २) ब्रॉयलर आणि लहान लेयर कोंबड्यांचा वाढीचा दर कमी होणे व वाढीसाठी जास्त खाद्य लागणे. ३) भूक मंदावणे आणि वजन कमी होणे. ४) प्रभावित पक्ष्यांचा तुरा आणि पाय फिकट होणे. नर पक्ष्यांमध्ये वरील लक्षणे अधिक स्पष्ट असतात आणि हिवाळ्यात अशी लक्षणे अधिक तीव्र होतात. ५) अंडी देणाऱ्या पक्ष्यांत वरील लक्षणांबरोबरच अंडी उत्पादन १०-२०% कमी होते. ६) वरील सर्व लक्षणांबरोबरच कोंबड्यांमध्ये चेहऱ्यावर सूज येते, अश्रूंमध्ये वाढ होते, पापण्या सुजतात, त्यांच्यामध्ये संधिवात, पांगळेपणा येतो आणि पक्ष्यांच्या मेंदूच्या कार्यात घातक विकृती देखील येते.

मायकोप्लाइझ्मासोबत होणाऱ्या इतर संसर्गामुळे आणि पर्यावरणीय बदलांमुळे जास्तीत जास्त पक्षी आजारी पडतात आणि मरतुकही वाढू शकते. बऱ्याचदा वरील रोगाची लक्षणे अंडी उत्पादनाच्या प्रारंभी सुरु होतात. यावरून असे लक्षात येते की अंडी उत्पादनाच्या तणावामुळे पक्ष्यांमध्ये हा आजार बळावतो.

**निदान** : या रोगाचे अचूक निदान करण्यासाठी संक्रमित ऊती, स्वॅब आणि रक्तजल नमुन्यांची तपासणी केली जाते. शवविच्छेदनात श्वासनलिका आणि हवेच्या पिशव्यांमध्ये चीजसारखा स्राव आढळतो.

**प्रतिबंध** : मायकोप्लाज्मोसिसचे एखाद्या पोल्ट्री कळपातून संपूर्ण निर्मूलन करणे किंवा कळपाला मायकोप्लाइझ्मापासून मुक्त ठेवणे तसे कठीणच असते. तरी देखील आपण पुढील गोष्टी करू शकतो.

**अंडी उबवणीदरम्यान या प्रकारे मायकोप्लाइझ्मा नष्ट करावा**

१) अंडी ४६ अंश सेल्सियस उच्च तापमानात १४ तास ठेवून नंतर हळूहळू तापमान कमी करावे. २) उबवलेली अंडी प्रतिजैविक द्रवात बुडवावीत.

**अ) उबवलेल्या पिल्लांचे रक्षण**

१) पिल्लांना पहिले तीन दिवस पाण्यातून प्रतिजैविक द्यावे. २) त्यानंतर त्यांच्यावर ३-४, ९ आणि १६ आठवड्यांत प्रतिजैविकांनी उपचार करावेत.

**ब) कळपांना मायकोप्लाइझ्मापासून मुक्त ठेवणे**

१) शेडवर सेरोलॉजिकल टेस्टिंग आणि जैवसुरक्षा काटेकोरपणे पाळावी. शेडमध्ये वेगवेळ्या वयोगटाचे पक्षी ठेवू नये/ 'ऑल इन ऑल आऊट' प्रणाली वापरावी. बाहेरील व्यक्तींना पोल्ट्री फार्ममध्ये प्रवेश प्रतिबंधित करावा. शेडमध्ये पिल्ले आणण्यापूर्वी सर्व उपकरणे निर्जंतुक करून घ्यावीत. तसेच नवीन पिलांसाठीचे बेडिंग मटेरिअल नवीन, कोरडे आणि निर्जंतुक केलेले असावे. अंडी गोळा करण्यासाठी हातमोजे/ प्लॅस्टिकच्या फ्लॅट्सचा वापर करावा. ब्रीडर/ प्रजननकर्त्या कळपात श्वसनरोगाची लक्षणे दिसल्यास त्यांच्यावर त्वरित प्रतिजैविकांनी उपचार करून घ्यावेत. जैवसुरक्षा उपाय जर अयशस्वी होत असेल तर अशा ठिकाणी पक्ष्यांचे लसीकरण करून घ्यावे.

**ब्रॉयलर पिलांचे संरक्षण** : पिलांना पशुवैद्यकाच्या सल्ल्याने पहिल्या ३ दिवसांतच प्रतिजैविक द्यावे. त्यानंतर ३ ते ४ आठवड्यांच्या अँटिबायोटिकचा दुसरा डोस द्यावा. प्रतिजैविके देताना ती पिण्याच्या पाण्यात किंवा पर्यायी इंजेक्शनाद्वारे देखील देता येतात. ■